# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**(ISO 9001:2008 प्रमाणित)**

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

**(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०**

**website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in**


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१९/ 3280

दिनांक :-

- 5 NOV 2019

प्रति,

प्राचार्य,

शासकीय/अनुदानित/विनाअनुदानीत पदविका व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था

औरंगाबाद विभाग

**विषय**:- शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील विविध तांत्रिक पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या अनुषंगाने फिडबॅक फार्म भरुन घेणेबाबत.

**संदर्भ** :-मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म. रा., मुंबई यांचे पत्र क्र.१०/एडीएम/पदविका/ २०१९/१२०४, दि.०२/११/२०१९

उपरोक्त विषयास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील विविध तांत्रिक पदविका अभ्यासक्रमांचे प्रवेश वाढविण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रशिक्षण संचालनालय म. रा., मुंबई व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्या संयुक्त परिश्रमाने, राज्यातील तंत्रनिकेतनांनी समुपदेशन सभा, जनजागृती मोहीम, जाहिराती अशा विविध उपक्रमाद्वारे आपले योगदान दिलेले होते. त्याचाच परिणाम म्हणजे शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये विविध तांत्रिक पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश हे मागील शैक्षणिक वर्षापेक्षा साधारण १० टक्के वाढले आहे. आता शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील विविध तांत्रिक पदविका अभ्यासक्रमातील प्रवेशाच्या अनुषंगाने संचालनालयाने सर्व तंत्रनिकेतनातील प्राचार्य/संचालक तसेच प्रवेशीत विद्यार्थ्यांकडून फिडबॅक घेण्याचे ठरविले आहे.

त्यानुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्राचार्य/संचालक व आपल्या संस्थेत प्रवेशीत विद्यार्थ्यांपैकी ५% विद्यार्थ्याकडून सोबत जोडलेला फॉर्म भरुन घेण्यात यावा. प्राचार्य/संचालक व विद्यार्थ्यांकडून भरुन घ्यावयाचा फिडबॅक फॉर्म जोडत आहे. सदर फिडबॅक फॉर्म भरुन दि.०७-११-२०१९ पर्यंत या कार्यालयास विशेष दुताद्वारे पाठविण्यात यावेत.

सोबतः वरीलप्रमाणे

प्र.सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रतः या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी